**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातल्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी १७ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम खर्च होणार असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देताना लोकसभेत प्रतिपादन

- केंद्रीय अर्थसंकल्प आणि भारत-अमेरिका व्यापार करारावरुन विरोधी पक्षांची टीका

- कॅनडात शाळेत झालेल्या गोळीबारात ८ जणांचा मृत्यू, २५ जखमी

- इराणमधल्या हिंसाचार प्रकरणी राष्ट्राध्यक्षांकडून जनतेची क्षमा याचना

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत अफगाणिस्तान विरुद्धच्या सुपर ओव्हरपर्यंत गेलेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिका विजयी

**<><><><><>**

यंदाच्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी एकूण १७ लाख कोटी रुपयांहून अधिक खर्च केला जाणार आहे. ही रक्कम देशाच्या जीडीपीच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्के असल्याचं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज केलं. लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देताना त्या बोलत होत्या. १६ व्या वित्त आयोगानं राज्यांना ४१ टक्के निधी देण्याची सूचना केली आहे. येत्या आर्थिक वर्षात हा सुमारे साडे २५ लाख कोटी रुपयांचा निधी दिला जाणार असल्याचं त्या म्हणाल्या. गेल्या वित्त आयोगाच्या कालावधीत सुद्धा निर्धारित असलेला सर्व निधी राज्यांना दिला होता. वित्त आयोगाच्या अहवालात त्याचा स्पष्ट उल्लेख असल्याचं त्यांनी नमूद केलं.

रोजगारनिर्मितीसाठी या अर्थसंकल्पात काहीही उपाययोजना केल्या नसल्याचा आरोप त्यांनी फेटाळून लावला आणि रोजगारनिर्मितीसाठी केलेल्या विविध घोषणांची माहिती दिली.

**- - - होल्ड - सीतारामन बाइट - - -**

या अर्थसंकल्पात MSME क्षेत्रावर भर दिल्याचंही त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

त्यापूर्वी अर्थसंकल्पावरच्या चर्चेत सहभागी होताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय अर्थसंकल्पात कोणत्याही ठोस उपाययोजना  केल्या नसल्याची टीका केली. सध्या जगभरात संघर्ष सुरू आहे, मात्र या संघर्षाचा सामना करण्यासाठी आवश्यक तरतुदी  या अर्थसंकल्पात नाहीत असा आरोप त्यांनी केला. या अर्थसंकल्पात कृत्रिम बुद्धिमत्तेवर भर देण्यात आला आहे, मात्र एआयमुळे अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातले अनेक रोजगार कमी होणार आहेत याकडे गांधी यांनी लक्ष वेधलं. भारत आणि अमेरिका व्यापार करारावरुन त्यांनी सरकारवर टीका केली. समान न्याय तत्वावर नव्हे तर बळजबरी म्हणून सरकारनं हा करार केला आहे. युवा आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे हा करार दुर्लक्ष करतो आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी आज केला.

या अर्थसंकल्पात नव्या भारताचं प्रतिबिंब दिसत असून शिक्षण, आरोग्य आणि रोजगारावर या अर्थसंकल्पात लक्ष केंद्रित केल्याचं शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यसभेतही आज अर्थसंकल्पावरील चर्चा झाली. भारताकडे जगाचं नेतृत्व करण्यासाठीची प्रतिभा, महत्त्वकांक्षा आणि उद्यमशीलता आहे, असं माजी प्रधानमंत्री एच डी देवेगौडा यावेळी म्हणाले. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या उभारणीसाठी हा अर्थसंकल्प महत्त्वाचा आहे, असं सांगत केवळ वाढ नाही तर रोजगार निर्मितीचा देखील धोरणनिर्मितीत विचार व्हायला हवा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अमेरिकेसोबतचा मुक्त व्यापार करार घोषित झाल्यामुळे पूरक किंवा सुधारित अर्थसंकल्प जाहीर करावा अशी मागणी काँग्रेस नेते राजीव शुक्ला यांनी सभागृहात केली. तर हा अर्थसंकल्प युवा, शेतकरी, महिला, गरीब या सर्वांच्या हिताचा असल्याचं मत भाजपा खासदार अशोक चव्हाण यांनी व्यक्त केलं.

**<><><><>**

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यावरचा अविश्वास दर्शक ठराव विरोधी पक्षांनी काल लोकसभेच्या महासचिवांना सादर केला होता. या ठरावात काही त्रुटी आढळल्यामुळे तो फेटाळला जाऊ नये म्हणून त्यात दुरुस्ती करावी अशी सूचना ओम बिर्ला यांनी सचिवालयाला

केली. त्यानंतर त्यात दुरूस्ती करून ठराव पुन्हा सादर करण्यात आला. काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्षासह विविध पक्षांच्या ११८ सदस्यांनी याला पाठिंबा दिला आहे.

<><><><><>

केंद्र सरकारने राष्ट्रीय गीत वंदे मातरम संदर्भात आज नवे दिशानिर्देश जारी केले. त्यानुसार सरकारी कार्यक्रमांमधे, शाळांमधे, तसंच इतर महत्त्वाच्या कार्याक्रमांमधे जन गण मन या राष्ट्रगीतानंतर लगेचच वंदे मातरम् वाजवणे अनिवार्य असेल. वंदे मातरम गीताची सर्व सहा कडवी वाजवली जातील. यापूर्वी वंदे मातरमची दोनच कडवी प्रचलित होती, आता मात्र हे गीत संपूर्ण वाजवलं जाईल, असं या दिशानिर्देशांमधे म्हटलं आहे.

<><><><><>

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. काल रात्री त्यांनी गृहमंत्री अमित शहा यांचीही भेट घेतली होती. त्यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, त्यांचे सुपुत्र पार्थ आणि जय पवार हेही उपस्थित होते.

<><><><><>

राज्यात गेल्या वर्षी दुष्काळग्रस्त, अतिवृष्टी आणि पूरग्रस्त म्हणून जाहीर केलेल्या तालुक्यातल्या विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क माफ केल्याचा शासन निर्णय सरकारनं आज जारी केला. ही सवलत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी लागू असून सर्व विद्यापीठं, परीक्षा मंडळं आणि महाविद्यालयातल्या विद्यार्थ्यांना ही शुल्क माफी लागू असेल.

<><><><><>

एस.टी. महामंडळानं 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (NCMC) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग यासारख्या सर्वांना विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असेल. १९९ रुपये देऊन हे कार्ड विकत घ्यावे लागेल. बसस्थानकांवर तसंच विविध ३ हजार एजंटकडे हे कार्ड मिळणार आहे.

<><><><><>

कॅनडातल्या ब्रिटिश कोलंबियामध्ये एका शाळेत झालेल्या गोळीबारात ८ जणांचा मृत्यू झाला. यामध्ये गोळीबार करणाऱ्या महिलेचाही समावेश असण्याचा अंदांज आहे , असं

स्थानिक पोलिसांनी सांगितलं. याशिवाय, या शाळेजवळच्या एका घरात २ मृतदेह सापडले आहेत. या घटनेत २५ जण जखमी झाले आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात या घटनेत मृत पावलेल्यांच्या कुटुंबियांप्रति सहवेदना व्यक्त केली असून जखमी लवकर बरे होवोत अशी कामना केली आहे.

<><><><>

इराणमधे सरकारविरोधी आंदोलनावर केलेल्या कारवाईत अनेकांचा मृत्यू झाल्याप्रकरणी तसंच अनेक जण जखमी झाल्याप्रकरणी इराणच्या राष्ट्राध्यक्षांनी माफी मागितली आहे. या आंदोलनामागे पाश्चिमात्य देशाच्या प्रचाराचा हात असल्याचा आरोपही राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी केला. या आंदोलनादरम्यान जे मृत्यू झाले त्याबद्दल पेझेश्कियान यांनी दुःख व्यक्त केलं. मात्र याला सुरक्षा दल जबाबदार नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे. सरकार नागरिकांशी संघर्ष करू इच्छित नाही असंही पेझेश्कियान यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत अहमदाबाद इथं आज झालेल्या चुरशीच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने सुपर ओव्हरमधे  अफगाणिस्तान वर चित्तथरारक विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेच्या ६ बाद १८७ धावांची बरोबरी अफगाणिस्ताने १९ षटकं ४ चेंडूत सर्व गडी गमावून केली.  रहमानउल्लाह गुरबाज़ने ४२ चेंडूत ८४ धावा फटकावल्या. बरोबरी झाल्यामुळे  सुपर ओव्हर खेळवली गेली. पहिल्या सुपर ओव्हरमध्ये दोन्ही संघाच्या पुन्हा समान धावा झाल्या. दुसऱ्या सुपर ओव्हरमधे दक्षिण आफ्रिकेने २३ धावा केल्या, त्याचा सामना करताना गुरबाजने तीन षटकार ठोकले, मात्र नंतर केशव महाराजच्या गोलंदाजीवर तो बाद झाला.

श्रीलंकेत कोलंबो इथं ग्रुप ‘बी’ च्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने  आयर्लंडवर ६७ धावांनी विजय मिळवला.

मुंबईच्या वानखेडे मैदानावर इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडीज हा ग्रुप ‘सी’ मधला सामना सुरु आहे. नाणेफेक जिंकून इंग्लंडने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोग घेत असलेल्या नागरी सेवा परीक्षा आणि वन सेवा परीक्षेकरिता आवेदनपत्र भरलेल्या उमेदवारांना त्यांच्या अर्जात बदल करण्याची संधी मिळणार आहे. ही संधी एकदाच मिळणार असून उमेदवारांना सादर केलेल्या स्वतःच्या माहितीत फेरबदल करता येतील. ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत उलटून गेल्यानंतर तीन दिवस ही संधी मिळणार  असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

<><><><><>

पोर्तुगालचे गृहमंत्री मारिया लूसिया अमरला यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. ३१ जानेवारीच्या सुमारास मध्य पोर्तुगालमध्ये आलेल्या क्रिस्टीन या चक्रीवादळाला सरकारनं उशीरा प्रतिसाद दिल्याच्या वाढत्या टीकेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी राजीनामा दिला.

<><><><><>

नवीन कामगार कायदे, तसंच केंद्रसरकारच्या विविध धोरण आणि निर्णयांविरोधात देशभरातल्या १० प्रमुख कामगार संघटनांनी उद्या एक दिवसाच्या देशव्यापी बंदचा इशारा दिला आहे. वीज, बँका, विमा, वाहतूक, आरोग्य, तसंच गॅस आणि पाणीपुरवठा क्षेत्रातले सुमारे ३० कोटी कामगार या बंदमधे सहभागी होणार असल्याचा दावा आयटकच्या सरचिटणीस अमरजीत कौर यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना केला.

<><><><><>

पेसा भरती पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने आज शासन आदेश जारी केला आहे. त्यानुसार ज्या गावामधे आदिवासींची लोकसंख्या ५० टक्क्यापेक्षा अधिक किंवा २५ ते ५० टक्क्या दरम्यान आहे तिथं ५० टक्के पदं अनुसूचित जमाती प्रवर्गातून भरावीत असा निर्णय सरकारने घेतला आहे.

//<><><><><>//